# <u>लोकअदालत</u>

## <u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कामठी यांचे न्यायालय</u>

**<u>संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र.५७९/२०२६</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | – | ०३.०३.२०२६ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | – | ०३.०३.२०२६ |
| ३ | फिर्यादीचे नांव व पत्ता | – | पोलीस स्टेशन अधिकारी,<br>मार्फत पोलीस स्टेशन कन्हान |
| ४ | आरोपीचा नांव व पत्ता | – | **अमोल दशरथ संभारे**<br>वय – ३६ वर्ष, व्यवसाय – मजुरी<br>रा. निलज खंडाळा, हनुमान मंदीर, कन्हान,<br>ता. पारशिवनी, जि. नागपूर. |

५(अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील

तुम्ही वर नमूद आरोपीने दि.०३.०३.२०२६ रोजी १३.२० ते १३.५० वाजताचे सुमारास स्वामी विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपुर येथे तुमच्या ताब्यातील वाहन दारु पिवून मद्याचे अंमलखाली झिगझॉक व अनियंत्रीतणे चालवित होता व त्याद्वारे तुम्ही आरोपीने मोटार वाहन कायदयाचे कलम १८५ अन्वये गुन्हा केला.

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कामठी

दि.१४.०३.२०२६

## आरोपीचे निवेदन –

प्रश्न – तुम्हाला पोलीस केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय
प्रश्न – तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप तुम्हाला समजला काय ?
उत्तर – होय.
प्रश्न – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – मला गुन्हा कबूल आहे.

अमोल संभारे
.......................................
आरोपीची सही

समक्ष

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कामठी

दि.१४.०३.२०२६

## **न्यायनिर्णय**

प्रस्तुत खटल्यात आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे. शिक्षेच्या संदर्भात त्याचे म्हणणे एकुण घेण्यात आले. आरोपीने कथन केले आहे की त्याने सदरचा गुन्हा जाणूनबजून केलेला नाही. त्याच्या कडून अनवधानाने सदरचा गुन्हा घडला आहे. तसेच त्याची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. त्यामुळे त्याला कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली आहे. सदर गुन्हयास कारावास किंवा दंड अशी शिक्षा असल्याने व आरोपीने गुन्हा स्वखुशीने स्वीकार केल्याने त्याला दंडाची शिक्षा देणे योग्य आहे. आरोपीने गुन्हा स्वखुशीने कबुल आहे असे कथन करणारे पुरसिस निशाणी २ कडे दाखल केले आहे. आरोपीचे म्हणणे व गुन्हयांचे स्वरुप लक्षात घेता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. आरोपीला याद्वारे मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये दोषी ठरवून त्यास **रु.१०,०००/- (दहा हजार रूपये)** दंडाची शिक्षा करणेत येते. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस साध्या कारावासाची शिक्षा करणेत येते.

२. प्रकरण येणे प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

14/3/26

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कामठी

दि.१४.०३.२०२६

Fine Amt of Rs- 10000/- deposited vide R.No-189/26 Dt-14/03/26

14/3/26